आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १३७ वा ● गुरुवार दि. २४ ऑक्टोबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्तांनी घेतला आढावा

ठाणे, (जिमाका): निवडणूक प्रक्रिया पार पाडणे, हे टीम वर्क असून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपासून ते मतदान केंद्रावरील प्रत्येक कर्मचाऱ्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी ही सर्वांनी गांभिर्याने व जबाबदारीने पार पाडण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी झालेल्या बैठकीत सर्वांना दिले.

विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने तसेच सर्व जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी, नोडल अधिकारी उपस्थित होते.

## मतदार वंचित बहुजन आघाडीकडे समर्थ पर्याय म्हणून पाहत आहेत : विनोद खटके

लातूर : लातूरचे मतदार स्थानिक आमदारांना कंटाळले असून ते वंचित बहुजन आघाडीकडे एक समर्थ पर्याय म्हणून पाहत आहेत, असे प्रतिपादन लातूर शहर विधानसभा मतदार संघाचे वंचितचे अधिकृत उमेदवार विनोद खटके यांनी बुधवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना केले. आपण मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आज गुरुवारी पदयात्रा काढून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी लातूर शहर विधानसभेसाठी व्ही.एस. पँथरचे संस्थापक अध्यापक अध्यक्ष विनोद खटके यांना उमेदवारी घोषित केल्यापासून लातूरमधील युवकात जणू नवचैतन्य संचारले आहे. विनोद खटके आपला उमेदवारी अर्ज गुरुवार, दि. २४ ऑक्टोबर २०२४ रोजी दाखल करणार आहेत. त्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना उमेदवार विनोद खटके म्हणाले की, गुरुवारी सकाळी आपण वंचित बहुजन आघाडीच्या प्रमुख नेते आणि आपल्या व्ही. एस. पँथरच्या पदाधिकारी - समर्थकांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून पदयात्रेने शहरातील प्रमुख मार्गाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर येणार आहोत. डॉ. आंबेडकर पार्कवर भव्य जाहीर सभा



होईल. तेथूनच आपण आपला उमेदवारी अर्ज दाखल करायला जाणार असून अर्ज दाखल केल्यानंतर पुन्हा जाहीर सभेत सहभागी होणार आहोत. अर्ज दाखल करायला गेल्यानंतरही सभा चालूच राहणार आहे. आपल्या पक्षाचे नेते त्यावेळी सभेला संबोधित करतील, असे त्यांनी सांगितले.

आपली उमेदवारी ही विजयसाठीची उमेदवारी आहे. प्रत्येकाला राजकीय महत्वाकांक्षा असते, नव्हे असलीच पाहिजे,असे सांगून विनोद खटके पुढे म्हणाले की, मागच्या अनेक काळापासून लातूरच्या जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न प्रलंबित आहे. त्यासाठी लातूरच्या माझं लातूर परिवाराने सर्वतोपरी प्रयत्न केले. विविध आंदोलने केली, तरीही हा प्रश्न अद्याप सुटला नाही. दलित - मुस्लिम समाज सर्वाधिक संख्येने या रुग्णालयाचा लाभ घेत आला आहे. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आपण प्राधान्याने प्रयत्नशील राहू. लातूरच्या एमआयडीसीमध्ये आतापर्यंत एकही मोठा प्रकल्प आणला गेला नाही. आपण त्यासाठीही प्रयत्नरत राहणार आहोत. लातूरमध्ये मुबलक पाणी आहे. फक्त त्याचा विनियोग व्यवस्थित होत नाही. उपलब्ध असलेले पाणी नेमके कुठे मुरते ? या प्रश्नाची सोडवणूक आपण नक्कीच करू. अशा अनेक प्रलंबित प्रश्नांमुळेच मतदार आता वंचित आघाडीकडे समर्थ पर्याय म्हणून पाहत आहेत.

भारतीय राज्यघटना कोणीही बदलू शकत नाही. वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांची मते विभागण्याचा प्रयत्न सगळ्यांकडून होतोय. त्यांनी लोकसभा निवडणुकीवेळी मांडलेले सर्व आडाखे वास्तवात उतरले आहेत, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मी अनेकांना भेटलो आहे. मला गरिबीची जाण आहे. माझी गोरगरीब मतदारांशी नाळ जुळली आहे, असेही विनोद खटके यांनी सांगितले. याप्रसंगी वंचितचे मराठवाडा महासचिव संतोष सूर्यवंशी, रमेश गायकवाड, जिल्हा महासचिव ॲड. रुपेश सोमवंशी, सौफिभाई सय्यद, व्ही.एस. पँथरचे अमोल सुरवसे, आनंद जाधव, पंकज शिंदे, संदीप बानाटे , नितेश पटसाळे, सिद्धांत चिकटे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी गठीत पथकांचा निवडणूक निरीक्षकांनी घेतला आढावा

लातूर, : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी




भारत निवडणूक आयोगाने लातूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांसाठी जयप्रकाश उपाध्ये व डॉ.रामसिंह गुर्जर या दोन निवडणूक खर्च निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. या दोन्ही निवडणूक निरीक्षकांनी आज जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी गठीत केलेल्या पथकांच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच अनुषंगिक सूचना दिल्या. तसेच खर्च विषयक बाबींवर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्यासह विविध पथकांचे नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी भरारी पथके, व्हिडीओ सर्व्हीलंस टीम, चेकपोस्ट स्थापन करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून प्रचार सभा, प्रचारासाठी वाहनांचा वापर यावर होणारा खर्च याचे संनियंत्रण केले जात आहे. या सर्व पथकांनी आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडावी, अशा सूचना निवडणूक खर्च निरीक्षक जयप्रकाश उपाध्ये व डॉ.रामसिंह गुर्जर यांनी उपस्थितांना दिल्या. तसेच उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची नोंदवही भरण्याबाबत उमेदवार प्रतिनिधींना सूचना द्याव्यात, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने माहिती दिली.

## २५ ऑक्टोबरला आ अभिमन्यू पवार यांचा उमेदवारी अर्ज होणार दाखल..

औसा - खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत महायुती चे अधिकृत उमेदवार आमदार अभिमन्यू पवार दि.२५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. याप्रसंगी भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, रिपाई, रयत क्रांती संघटना व महायुती मित्रपक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर औसा येथून गांधी चौक - हनुमान मंदिर - तहसील कार्यालय अशी शंखनाद रॅली आयोजित करण्यात आली आहे. महायुती च्या पहिल्याच यादीत आमदार अभिमन्यू पवार यांच्या नावाचा समावेश झाला असून भाजप पक्षाकडून त्यांना दुसऱ्यांदा उमेदवारी देण्यात आली आहे. २०१९ मध्ये आमदार अभिमन्यू पवार यांना पक्षाने पहिल्यांदा उमेदवारी दिल्यानंतर ते मताधिक्याने विजयी झाले आहेत. या पाच वर्षांत मतदारसंघात विकासाचे राजकारण करीत त्यांनी विकासाचा अनुशेष भरून काढला आहे. याचबरोबर शेत तिथे रस्ता, मनरेगातून ग्रामसमृद्धी अभियानाअंतर्गत मतदारसंघाची वेगळी ओळख राज्याला करून दिली आहे मतदारसंघातील सिंचनक्षेत्र वाढविणे, उद्योगाला चालना व रोजगार निर्मिती आदीसह रस्ते विकास, आदीवर त्यांनी प्रभावीपणे काम केले असून मतदारसंघाचे प्रश्न विधीमंडळाच्या माध्यमातून सोडविण्यावर त्यांनी विशेष काम केले आहे.




## निवडणूक विषयक पथकांनी सतर्क राहून कामकाज करावे- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर : विधानसभा निवडणुकीसाठी गठीत करण्यात आलेल्या सर्व पथकांनी सतर्क राहून आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडावी. यामध्ये कोणत्याही प्रकारे दिरंगाई अथवा हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात आयोजित निवडणूक पथक प्रमुखांच्या बैठकीत त्या बोलत होत्या.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, पोलीस उपाधीक्षक गजानन भातलवंडे, जिल्हा कोषागार अधिकारी उज्वला पाटील, शिक्षणाधिकारी तथा स्वीपचे नोडल अधिकारी नागेश मापारी, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक केशव राऊत यांच्यासह विविध निवडणूक पथकांचे नोडल अधिकारी, विविध समितींचे सदस्य यावेळी उपस्थित होते. स्वीप समिती, प्रसारमाध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती, इन्फोर्समेंट समिती, कॅश रिलीज कमिटी आदी विविध समितींचा आढावा यावेळी घेण्यात आला.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया शांततामय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर विविध पथके गठीत करण्यात आली आहे. या सर्व पथकांनी परस्परांशी समन्वय ठेवून आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी. आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी, निवडणूक खर्च संनियंत्रण करण्यासाठी स्थापन केलेल्या पथकांनी अधिक दक्ष राहून कामकाज करावे. रोख रक्कम अथवा अवैध दारू, अंमली पदार्थ जप्तीची कार्यवाही केल्यास प्रत्येक बाबीची बारकाईने नोंद घेवून अहवाल सादर करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

स्वीप कक्षामार्फत मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबवून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. एमसीएमसी समितीने राजकीय जाहिरात प्रमाणीकरण, पेड न्यूज आदी बाबींवर बारकाईने लक्ष ठेवावे. रोख रक्कम वाहतूक किंवा मतदारांना आमिष दाखविण्याचे प्रकार आढळून आल्यास त्वरित कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल ऑनलाईन पोर्टलवर सादर करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी प्रारंभी सर्व समिती, कक्षांवर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीबाबत माहिती दिली.

## कर वसुलीची मनपाची मोहीम सुरूच, थकबाकीदारानी टैक्स भरणा करुन कार्यवाही टाळावी - मनपा आयुक्त. बाबासाहेब मनोहरे

लातूर/प्रतिनिधी: थकित कर वसुलीसाठी लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने वसुली मोहीम राबविण्यात येत असून वारंवार नोटीसा देऊनही कर भरणा करण्यात येत नसल्याने जप्ती केली जात आहे.अशाच कारवाईत बुधवारी (दि.२३) दोन भूखंड जप्त करण्यात आले.एका वसतिगृहाच्या कार्यालयाला व ३ गाळ्यांना सील ठोकण्यासह ३ नळ जोडण्या खंडित करण्याची कारवाई करण्यात आली. शहरातील ए झोनमध्ये दोन खुल्या भूखंडांवर २५ लाख ३५ हजार ३७८ रुपयांचा मालमत्ता कर थकलेला होता. पालिकेने ते दोन्ही भूखंड जप्त करून त्यावर मनपाच्या मालकीचा फलक लावला.सी झोनमध्ये एका वसतिगृहाकडे ३ लाख ३१ हजार ६९२ रुपये कर थकित होता.तो न भरल्यामुळे वसतिगृहाच्या कार्यालयाला सील ठोकण्यात आले.४ लाख ८ हजार ८६२ रुपयांचा थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या वसुलीसाठी ३ नळ जोडण्याही तोडण्यात आल्या.डी झोनमध्ये ३ गाळेधारकांकडे २ लाख २६ हजार ७२६ रुपये मालमत्ता कर थकीत होता.त्यामुळे ते तीनही गाळे सील करण्यात आले.आणखी एका गाळेधारकाकडे २९ हजार २९९ रुपयांचा मालमत्ता कर थकित होता. पालिकेने हा गाळा सील करताच संबंधितांनी थकीत रकमेचा धनादेश मनपाकडे सुपूर्द केला. थकीत कराच्या वसुलीसाठी मनपाकडून मोहीम राबविण्यात येत आहे.ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. त्यामुळे जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी आपल्याकडील कर भरून मनपाला सहकार्य करावे,असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.



## उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे सादर करताना दिशानिर्देशांचे पालन करणे आवश्यक

लातूर, : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी निवडणूकीची सूचना प्रसिध्द झालेली आहे. लातूर शहर विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात नामनिर्देशनपत्रांची वितरण व्यवस्था सकाळी ११ ते ३ या वेळेत मदत कक्ष, पहिला मजला, तहसील कार्यालय, लातूर येथे करण्यात आलेली आहे. उमेदवारांना किंवा त्यांच्या सूचकाला नामनिर्देशनपत्रे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे मंगळवार, २९ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त दुपारी ३ वाजेपर्यंत कोर्ट हॉल पहिला मजला, तहसील कार्यालय, लातूर येथे दाखल करता येतील.

२३ ऑक्टोबर, २०२४ रोजी लातूर शहर विधानसभा मतदारसंघातंर्गत एकूण २२ नामनिर्देशनपत्रे वितरीत करण्यात आली आहे. आजपर्यंत एकूण १०७ नामनिर्देशनपत्रांचे वितरण झाले असून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्राप्त नामनिर्देशनपत्रांची संख्या निरंक आहे. उमेदवार किंवा सूचक यांनी नामनिर्देशपत्र सादर करतांना दिशानिर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

नामनिर्देशपत्र दाखल करतांना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात उमेदवार व इतर ४ अशा एकूण ५ व्यक्तींनाच प्रवेश करता येईल. ५ पेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेश मिळणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचे १०० मीटर परिसरात उमेदवारास फक्त ३ वाहनासह निवडणूक नियमाचे पालन करुन प्रवेश करता येईल .

निवडणूक लडविणाऱ्या उमेदवारांना ४ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी ३ नंतर चिन्हांचे वाटप करण्यात येईल. राष्ट्रीय व राज्य स्तरावरील मान्यताप्राप्त पक्षाचे अधिकृत उमेदवारास पक्षाचे राखीव असलेले चिन्ह देण्यात येईल व इतर उमेदवारास प्रथम नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या पसंती क्रमानुसार व उपलब्धतेनुसार मुक्त चिन्हांमधून चिन्ह वाटप करण्यात येईल. लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीसाठी मान्यताप्राप्त राष्ट्रीय, राजकीय पक्षाने पुरस्कृत केलेल्या उमेदवारासाठी १ प्रस्तावक व नोंदणीकृत अमान्यता प्राप्त राजकीय पक्ष व इतर अपक्ष उमेदवारासाठी १० मतदार प्रस्तावक लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील असणे आवश्यक आहेत .

नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने १० हजार रुपये तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवार यांनी ५ हजार रुपये अनामत रक्कम भरुन त्याची पावती नामनिर्देशपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे. उमेवाराने निवडणूक खर्चासाठी, बँकेत निवडणूकीसाठी नवीन स्वतंत्र खाते उघडणे आवश्यक आहे. निवडणूक खर्चासाठीचा बँक खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत नामनिर्देशपत्र सादर करतेवेळी कळविणे आवश्यक आहे, असे लातूर शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे यांनी कळविले आहे.

## ज्ञानतीर्थ युवक महोत्सवात लातूरच्या चन्नबसवेश्र्वर फार्मसीचे नेत्रदीपक यश

लातूर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,सहयोग



सेवाभावी संस्था, कॉलेज ऑफ एज्युकेशन विष्णूपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात लातूरच्या चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे.

या युवक महोत्सवात चन्नबसवेश्र्वर फार्मसीच्या २० विद्यार्थिनी आणि ५ विद्यार्थ्यांनी मिळून वक्तृत्व, वादविवाद, लावणी, आदिवासी नृत्य, मूक अभिनय, विडंबन, समूह गायन, सुगम गायन, कथाकथन, मेहंदी, रांगोळी, स्थळ छायाचित्रण अशा एकूण १३ कला प्रकारात यशस्वी सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. यामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्यात द्वितीय पारितोषिक पटकावले. तर मूक अभिनयात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या विद्यार्थ्यांना प्रा. यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव भीमाशंकर देवणीकर , प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी एस. एम. , प्राचार्य डॉ. एस. एस. थोंटे यांसह सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## भाजप आणि विविध पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

लातूर/प्रतिनिधी : लातूर ग्रामीण मतदारसंघातील पोहरेगाव येथील कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वावर विश्र्वास दाखवत काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सर्वांचे पक्षात स्वागत करून सर्वांना पक्षकार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री सर्जेराव मोरे, श्री लालासाहेब चव्हाण, रेणापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष श्री प्रमोद जाधव, रेणापूर बाजार समितीचे उपसभापती श्री शेषराव हाके पाटील, श्री गंगासिंह कदम, संतोष देशमुख, सुभाष घोडके आदीसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान भिसे वाघोली (ता. लातूर) येथील भाजपचे सोशल मीडिया समन्वयक श्री समाधान भिसे पाटील, जेवळी (ता. लातूर) सोसायटीचे चेअरमन श्री महेश अशोक नरवडे, उमाकांत दरकसे यांच्यासह अतुल भिसे , कल्याण भिसे , बालाजी भिसे , गोविंद भिसे , गणेश भिसे , पवन भिसे , ऋषिकेश गोगावकर , मुकिंदा मांदळे , विकास मांदळे , संगम मांदळे , प्रकाश मांदळे , मल्हारी मांदळे , अमित मांदळे , दिलीप मांदळे , अक्षय आदमाने , क्रांती पाटील , ज्ञानेश्र्वर गुंड , संतोष मांदळे , बाबासाहेब आदमाने , समीर सय्यद , संदीप मांदळे , नामदेव मांदळे , बल्लाळनाथ मांदळे आदींनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांचेही लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी पक्षात स्वागत केले.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## राजा नारायणलाल लाहोटी स्कूलच्या संघाची राष्ट्रीय समूह गायन स्पर्धेसाठी निवड

लातूर :- भारत विकास परिषद द्वारा




आयोजित पश्र्चिम विभागीय राष्ट्रीय समूहगीत गायन स्पर्धेत राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या संघाने प्रथम पारितोषिक पटकावले असून या संघाची निवड १५ डिसेंबर २०२४ रोजी बेंगलोर येथे होणाऱ्या राष्ट्रीय समूह गायन स्पर्धेसाठी झाली आहे.

भारत विकास परिषद देवगिरी प्रांत धुळे शाखेच्या वतीने २९ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झालेल्या प्रांतस्तरीय चेतना के स्वर समूह गायन स्पर्धेत राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या संघाने प्रथम पारितोषिक मिळवले होते या स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याने वडोदरा गुजरात येथे २० ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित पश्र्चिम विभागीय राष्ट्रीय समूहगीत गायन स्पर्धेसाठी स्कूलच्या एकमेव संघाची निवड देवगिरी प्रांतातून झाली होती.

विजेत्या संघामध्ये त्रिशा बाहेती, दिशा औटी, रिदम पाटील, आदिती थोरमोटे, पूर्वी शिंदे, मधुरा झंवर, दीक्षा धनमाने, उन्नती मुंढे. या स्पर्धकांचा समावेश आहे. या स्पर्धकांना श्री शिरीष देशपांडे,श्री तेजस , सौ.गीता मुंढे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे विश्र्वस्त अध्यक्ष लक्ष्मी रमणजी लाहोटी ,श्री शैलेश जी लाहोटी सचिव ड. श्री आशिष वाजपेयी चेअरमन श्री आनंद लाहोटी प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु रजिस्ट्रार श्री प्रवीण शिवनगीकर, समन्वयक मनोहर कबाडे, अरुण सेलवी, विनोद चव्हाण भारत विकास परिषद लातूर शाखा अध्यक्ष डॉ. विजय जाधव, सचिव सारंग अयाचित, देवगिरी प्रांत अध्यक्ष विश्र्वास लातूरकर, सचिव अमित कुलकर्णी, सौ. योगिता पत्की आदींनी कौतुक केले.

## उमेदवारीवरून अजितदादांची भुजबळांना तंबी? ''बंडखोरी करायची असेल तर...''

नाशिक : राज्यात विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतरही अजूनही जागा वाटपांच्या चर्चा सुरू आहेत. महायुतीमध्येही जागा वाटपाचा तिढा सुटला नाही. यंदाच्या निवडणुकीत महायुती आणि महाआघाडीत तीन प्रमुख पक्ष असल्याने जागा वाटपाचा तिढा वाढला आहे. दोन्ही आघाड्यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर बंडखोरीचा धोका संभवत आहे. अशातच आता पक्षाच्या नेत्यांकडून बंडखोरांना इशारा दिला जात आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अजित पवार यांनी थेट भुजबळांना इशारा दिला आहे. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव मतदारसंघ महायुतीतील शिंदेच्या शिवसेनेकडे गेला आहे. या मतदारसंघातून विद्यमान आमदार सुहास कांदे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. याच मतदार संघात समीर भुजबळ देखील इच्छुक आहेत. मात्र समीर भुजबळ यांना ही उमेदवारी न मिळाल्याने ते अपक्ष लढण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. नांदगाव मधून मागील निवडणुकीत सुहास कांदे यांनी पंकज भुजबळांचा पराभव केला होता. आता, समीर भुजबळ नांदगाव मधून निवडणूक लढण्यावर ठाम आहेत. नांदगाव येथे बंड करायचे असेल तर अगोदर पक्षातून राजीनामा द्या अजित पवार यांनी म्हटले असल्याचे म्हटले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समीर भुजबळ यांना अशी तंबी दिल्याची सूत्रांनी माहिती दिली आहे. मात्र तंबी दिल्याच्या वृत्ताला समीर भुजबळ यांनी इन्कार केला आहे. उद्या छगन भुजबळ येवला मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. त्यानंतरच समीर भुजबळ नांदगाव बाबत स्पष्ट भूमिका घेणार असल्याची माहिती आहे. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव मतदारसंघावरून महायुतीमध्ये हायव्होल्टेज पॉलिटिकल ड्रामा दिसण्याची शक्यता आहे.

## मुस्लीम व्यक्ती करू शकतात एकापेक्षा जास्त विवाहांची नोंदणी, काय म्हणाले मुंबई उच्च न्यायालय?

मुंबई : मुस्लिम विवाहाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. एक मुस्लिम व्यक्ती पर्सनल लॉ अंतर्गत महापालिकेत एकापेक्षा जास्त विवाहांची नोंदणी करू शकते, असे न्यायालयाने आपल्या ऐतिहासिक निर्णयात म्हटले आहे. न्यायमूर्ती बी.पी. कुलाबावाला आणि सोमशेखर सुंदरसन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, मुस्लिम पर्सनल लॉ एकापेक्षा जास्त विवाहांना परवानगी देतो. अल्जेरियन महिलेसोबत मुस्लिम पुरुषाच्या तिसऱ्या लग्नासाठी आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्याचे आदेश खंडपीठाने ठाणे महापालिकेच्या विवाह नोंदणी कार्यालयाला दिले आहेत. मुस्लिम व्यक्तीने फेब्रुवारी २०२३ मध्ये अर्ज दाखल केला होता. मुस्लीम तरुणाने न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत सांगितले होते की, त्याने अल्जेरियातील एका महिलेशी तिसरे लग्न केले आहे. आपल्या तिसऱ्या पत्नीसोबत लग्नाची नोंदणी करण्यासाठी त्याने ठाणे महापालिकेकडे अर्ज केला होता. महाराष्ट्र मॅरेज ब्युरो रेग्युलेशन आणि मॅरेज रजिस्ट्रेशन ॲक्टचा हवाला देत अधिकाऱ्यांनी **(पान ३ वर) ...**

# कोणता झेंडा घेवू हाती ?

## संपादकीय...

बाबासाहेब आयुष्यभर जातीयतेचे चटके सहन करुन ही, भारतीय समाज व्यवस्था एकग्र राहावी आणि तमाम जाती, जमातीच्या समुहानी सामाजीक ऐक्य जोपासून राष्ट्रीय एकात्मता जोपासावी या हेतूने अंखड भारताची भारतीय राज्य घटना दिली. याच घटनेनुसार आजवरचा स्वतंत्र भारत कार्यरत असताना आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नांवाचा उदोउदो करीत सर्वपक्षीय निवडणूक लढविली जाते आहे. कालची लोकसभा गेली, आजघडीला विधानसभा निवडणूकीच्या निमत्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने पडघम वाजून जो कांही हरेतुरेचा जल्लोष करुन स्वतःच्याच विजयाची खात्री देत असल्यामूळे आम्ही आंबेडकरीवादी जनतेने कोणता झेंडा हाती घ्यावा, हा प्रश्न भेडसावणारा दिसतो आहे. त्यामूळे तूम्हीच सांगा बाबासाहेब, आम्ही कोणता झेंडा हाती घ्यावा ?

भारतीय राजकारणात कॉंग्रेस, भाजपा, शिवसेना, दोन्ही गट, राष्ट्रवादीचे दोन्ही गट, मिळून सारे जे कोणी इतर मित्र पक्षाचे उमेदवार निवडणूक लढवित असताना प्रत्येकाकडे निळा झेंडा आहे. बाबासाहेब, आकाश धर्ती एक करुन निळ्या आकाशाचा चेहरा हा निळा ध्वज दिला, तो ध्वजच मोकळा असेल तर, तूमच्या विचार तत्वज्ञानाचे आम्ही काय करावे, हा प्रश्न राजकीय वर्तूळासह प्रसार माध्यमातून व्यक्त होत असला तरी आंबेडकरी चळवळीतील जे कोणी लोकसभा, आणि विधानासभेत प्रतिनिधित्व करीत आहेत, त्यांना तरी लाज कशी वाटत नसावी, हा ही विचार समाज माध्यमातून चर्चीला जात आहे.

सद्यास्थितीत आपण दिलेल्या संविधानानुसार निवडणूका होवू घातलेल्या आहेत. तूमच्याच नावावर जे कोणते पक्ष संघटना कार्यरत आहेत, त्यांची ही दुकानदारी जातीयवाद्याच्या सोबतीला आहे. त्यामूळे जाती निर्मूलनाचा प्रश्न आणि सामाजीक न्याय आणि धर्मनिरपेक्षतेचा प्रश्न बाजूला पडतो आहे. कारण असे की, जातीयवाद विरोधी धर्मनिरपेक्षता सामाजीक न्यायाचा लढा विरोधी पक्षाचे नेते करीत असताना आंबेडकरवादी नेतेच जर राष्ट्रीय स्वंय सेवक संघ आणि भाजपाच्या दावणीला बसत असतील तर आम्हा आंबेडकरवादी जनतेचे काय, हा प्रश्न आम्हाला भेडसावताना दिसतो आहे. त्यामूळे बाबासाहेब, तूम्हीच सांगा कोणता झेंडा हाती घ्यावा हे तूम्ही सांगणार काय, हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो.

वास्तविक पाहाता आजघडीला रिपाइं च्या नावावरचे आणि सामाजीक संघटनेच्या नावावर बाबासाहेब यांचा उदोउदो करणारे सर्वच नेते नागपूरच्या रेशीम बागे मध्ये तडफडत असतील तर दिक्षाभुमी आणि चैत्यभुमिवर आम्ही कोणाकडे हात पसरावेत हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो. यामूळे तूम्हीच सांगा आम्ही मूळातल्या कॉंग्रेस किंवा नंतरच्या भाजपाच्या दावणीला बसून आम्ही मतदान कोणाला करावे, आणि कोणता झेंडा कोणाच्या हाती द्यावा किंवा घ्यावा हा प्रश्न तूम्हीच सोडवावा एवढेच.

जेने करुन आम्ही तूमचे हस्तक बनून तूमच्या मस्तकानुसार कार्यरत असताना आमचेच नेते, संविधान बदलू पाहाणाऱ्या नेत्या बरोबर मांडीला मांडी लावून आंबेडकरवाद आम्हाला शिकवत असतील तर त्यांचे नाव ही आम्ही घेवू शकत नाही. कारण घरा, दारावर एक प्रकारची राखरांगोळीची चादर आंथरून आम्ही केवळ बाबासाहेब या नावा मुळे कार्यरत असताना आमचेच नेते जय भवानी, जय शिवाजी म्हणून कार्यरत असतील तर आम्ही कोणाचा झेंडा घेवून पुढे यायचे हे आम्हाला कळत नाही. त्यामूळे तूम्हीच सांगा कोणता झेंडा हाती घ्यावा.

आजघडीला कॉंग्रेस, भाजप आणि त्यांचे त्याचे मित्र पक्ष लोकशाही संविधानाच्या माध्यमातून निवडणूकीला सामोरे येत आहेत. प्रत्येकांच्या समोर हुजेरीगीरी करणारे निळे ध्वजधारी कार्यकर्ते समोर आहेत, पंरतू आम्ही फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचा निळा ध्वज सोबत संविधान घेवून मिरवित असताना आमचीच अवहेलना होताना दिसते आहे. याचे प्रकट चिंतन प्रसार माध्यमातून होताना दिसत नाही. मग ही चूक तूमची की प्रसार माध्यमाची असावी हे आम्हाला कळेनासे झाल्यामूळे आजघडीला आम्ही तूमच्या समोरच प्रश्न उभा करुन आम्ही कोणता झेंडा, कोणासाठी, कशासाठी घ्यावा याचे उत्तर तूम्ही द्याल काय, हे तूम्ही उत्तर देत नसाल तर आमच्या घरा, घरावर निळां, भगवा, हिरावा झेंडा फडकावून आमची ओळख कोणती ही हे सांगण्याचे धाडस आमच्यात राहाणार नाही. कारण पर्याय हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हाच असल्यामूळे केवळ तूम्हीच आमच्यासाठी अनिवार्य आहात, एवढेच सांगावेसे वाटते.

# जागतिक पोलिओ दिन

आज २४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पोलिओ मुक्तीसाठी मोलाचे योगदान देणारे शास्त्रज्ञ जॉन सॉल्क यांचा आज जन्मदिवस. जॉन सॉल्क आणि त्यांच्या टीमने पोलिओची पहिली लस शोधून काढली म्हणून त्यांचाच जन्मदिन जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय जागतिक आरोग्य संघटनेने घेतला. आजच्या दिवसाकडे पोलिओशी दिलेल्या यशस्वी लढ्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने १९९८ सालापासून पल्स पोलिओची मोहीम हाती घेतली. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यातील रविवार पोलिओ रविवार म्हणून साजरा केला जातो. पोलिओ रविवारच्या नंतरच्या आठवड्यात ० ते ५ वयोगतील बालकांना घरोघरी जाऊन पोलिओचा डोस पाजला जातो. त्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती केली जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आपल्या आरोग्य यंत्रणेने भारतातून पोलिओ मुक्तीसाठी अथक प्रयत्न केले. अमिताभ बच्चन, मोहम्मद कैफ इत्यादी व्यक्तींनीही दूरचित्रवाणीवरून जनजागृती केली. शासन, प्रशासन, आरोग्य यंत्रणा यांच्या अथक प्रयत्नातून आज भारत पोलिओ मुक्त झाला आहे. २७ मार्च २०११ या दिवशी जागतिक आरोग्य संघटनेने भारत पोलिओ मुक्त झाल्याची घोषणा केली. अर्थात सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाला पोलिओ मुक्त करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती. सुरवातीला तर पालक आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्यास तयारच होत नसे. आपल्या




बालकांना पोलिओ डोस पाजण्यास पालक निरुत्साही होते. लोक घरातून बाहेरच पडत नसत. पालकांचा निरुत्साह असला तरी आरोग्य खात्यातील कर्मचारी हिरमुसले नाही. त्यांनी त्यांचे काम चालूच ठेवले. एखादे व्रत हाती घेतल्या प्रमाणे देशातील आरोग्य कर्मचारी पोलिओ मुक्तीसाठी झटत होते. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना लवकरच यश मिळाले. १९९९ साली पोलिओच्या तीन विषाणूंपैकी दुसरा विषाणू नष्ट झाला मात्र पहिल्या आणि तिसऱ्या प्रकारचा विषाणू अजूनही कार्यरत होता. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यात दूषित पाण्यामुळे जुलाब,उलट्यांचे प्रमाण अधिक असल्याने तिथे तोंडावाटे दिलेली लस उपयुक्त ठरत नव्हती. तेंव्हा वैद्यकीय संशोधकांनी मुरदाबाद या गावात पोलिओची एक गुणी लस म्हणजे १,२,३ विषाणूंची लस वेगवेगळी प्रत्येक जन्मलेल्या बाळास दिली. मात्र देशातील सगळ्या बालकांपर्यंत असा कार्यक्रम पोहचवणे अशक्य होते. त्यानंतर पुन्हा त्यात संशोधन करण्यात आले. सर्वांना उपयुक्त अशा लसीची मात्रा तयार झाल्यानंतर देशात पोलिओ मुक्तीची मोहीम वेगाने राबवण्यात आली. त्याचा परिणाम म्हणजे आज पोलिओमुक्त मुक्त भारत अशी आपली ओळख बनली आहे. भारत जरी पोलिओमुक्त झाला असला तरी जगातून पोलिओचे अजूनही समूळ उच्चाटन झाले नाही. आफ्रिका खंडातील काही देशात तसेच आशिया खंडातील पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया या देशात अजूनही पोलिओचे रुग्ण आढळून येतात. या देशातूनही पोलिओ लवकरच हद्दपार होईल आणि जग लवकरच पोलिओमुक्त होईल अशी आशा करूया.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# श्री शंभुलिंग शिवाचार्य विद्यालयाच्या खेळाडूंनी गाजवली मैदानी स्पर्धा

लातूर :क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच जिल्हा क्रीडा संकुल येथील भव्य मैदानावर घेण्यात आलेल्या विविध पावसाळी शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था संचालित श्री शंभुलिंग शिवाचार्य विद्यालयातील विद्यार्थिनी उज्ज्वल संपादन केले आहे.

यामध्ये १४ वर्षे वयोगट मुली: (१) लांब उडी: कु. घेवरे गायत्री (इयत्ता ७ वी) हिने ३.७५ मीटर उडी घेऊन प्रथम आली आहे.

८० मीटर हर्डल्स: (१) कु. बहादुरे प्रणिता (इयत्ता : ७वी) हिने १९.२३ सेकंदात पूर्ण करत प्रथम आली आहे. (२) कु. घेवारी गायत्री (इयत्ता ७वी) हिने १९.५६ सेकंदात पूर्ण करत द्वितीय आली आहे.

४÷१०० शंभर मीटर रिले संघ प्रथम आलेला आहे. (१) कु. बहादुरी प्रणिता (इयत्ता ७ वी), (२) कु. घेवारी गायत्री (इयत्ता ७ वी), (३) कु. माने श्रद्धा (इयत्ता ७ वी), (४) कु. तोरणे आरती (इयत्ता ७ वी), (५) कु. घुगे प्राजक्ता (इयत्ता ७ वी) हा रिलेचा संघ प्रथम आलेला आहे.

१७ वर्षे वयोगटातील मुली १०० मीटर धावणे: (१) कु. कावरे कार्तिकी (इयत्ता ९ वी) प्रथम, (२) कु. बहादुरी गायत्री (इयत्ता ९ वी) तृतीय आली आहे. ड़

२०० मीटर धावणे: (१) कु. कावरे कार्तिकी (इयत्ता ९ वी प्रथम)

४०० मीटर धावणे: (१) कु. बुलबुले सीमा (इयत्ता ९ वी) प्रथम.

८०० मीटर धावणे: (१) कु. चव्हाण उत्कर्ष (इयत्ता १० वी) प्रथम

१५०० मीटर धावणे:(१) कु. वारद जानवी (इयत्ता ९ वी) द्वितीय, (२) कु. साळुंखे दीक्षा (इयत्ता: १० वी) तृतीय.

३००० मीटर धावणे: (१) कु. भोसले जानवी (इयत्ता: १० वी), द्वितीय (२) कु. लोदगे गायत्री इयत्ता: (१० वी), तृतीय.

०३ किलो मीटर चालणे: (१) कु. इंगळे संतोषी (इयत्ता: ९ वी), तृतीय.

१०० मीटर हर्डल्स: (१) कु. कार्तिकी नववी हिने (१८.६० सेकंदात) पूर्ण करत प्रथम आली आहे (२) कु. बुलबुली सीमा (इयत्ता : ९ वी) हिने (२२.२१ सेंकदात) पूर्ण करत दुसरी आली आहे.



४०० मीटर हार्डल्स: (१) कु. चव्हाण उत्कर्ष (इयत्ता: १० वी) हिने (१ मिनिट १.४५ सेकंदात ) पूर्ण करत प्रथम आली आहे. (२) कु. वत्ते अदिती (इयत्ता १० वी) हिने (२ मिनिट.१० सेकंदात ) पूर्ण करत द्वितीय आली आहे. ४÷१०० मीटर रिले: (१) कावरे कार्तिकी (इयत्ता : ९ वी), (२) कु. भादुरी गायत्री (इयत्ता नववी), कु. मेघना (इयत्ता: ९ वी), (३) कु. सीमा (इयत्ता: ९ वी, (४) कु. इंगळे संतोषी (इयत्ता : ९ वी) हा संघ प्रथम आलेला आहे.

४ ÷४०० मीटर रिले :- (१) कुमारी चव्हाण उत्कर्ष इयत्ता -१० वी (२) कुमारी साळुंखे ऐश्र्वर्या - दहावी (३) वत्ते आदिती इयत्ता - १० वी (३)४) कु. बिराजदार रेणुका इयत्ता :- इयत्ता :- १० वी (५) कु. साळुंखे दीक्षा इयत्ता -१० वी हा संघ प्रथम आलेला आहे . मैदानी स्पर्धा :- १४ वर्षे वयोगटातील मुले :- ६०० मीटर धावणे (१) चि. जाधव अजय इयत्ता - ८ वी तृतीय. ८० मीटर हार्डल्स :- (१) चि. गंगावणे पार्थ इयत्ता - ७ वी याने (१७.३७ सेकंदात ) पूर्ण करत तिसरा आला आहे . ४ ÷१०० मीटर रिले :- (१) कावरे साई इयत्ता - ६ वी (२) पार्थ गंगावणे इयत्ता -७ वी (३) जाधव अजय इयत्ता - ८ वी (४) बिराजदार आशुतोष इयत्ता -८ वी (५) कायते निखिल इयत्ता - ८ वी हा संघ द्वितीय आला आहे . १७ वर्षे वयोगटातील मुले :--४०० मीटर हार्डल्स :- (१) भिसे ईशांत इयत्ता - ९ वी प्रथम (२) चव्हाण ओंकार इयत्ता -९ वी दुसरा . ४÷४०० मीटर रिले :- (१) भिसे ईशांत इयत्ता -९ वी (२) साठे सुमित इयत्ता -९ वी ४÷४०० मीटर रिले :- (१)- भिसे ईशांत इयत्ता -९ वी (२) साठे सुमित इयत्ता -९ वी (३) जाधव यश इयत्ता -९ वी (४) चव्हाण ओमकार इयत्ता -९ वी (५) चामे अमित इयत्ता - १० वी हा संघ दुतीय आलेला आहे . ५ किलो मीटर चालणे (१) चि. साठे सुमित इयत्ता - ९ वी द्वितीय .(२) चि. महाजन ओम इयत्ता -१० वी तृतीय आला आहे.

प्रथम व द्वितीय आलेल्या सर्व विद्यार्थी (खेळाडूंची ) नांदेड येथे होणाऱ्या विभागीय स्तरावर निवड झाल्याबद्दल महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री आदिनाथजी सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील (तपसे चिंचोलीकर), सचिव श्री माधवराव पाटील (टाकळीकर), सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे व सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक कोळी एस.एम यांच्या शुभहस्ते प्राविण्य मिळवलेल्या खेळाडूंचा गुलाब पुष्प देऊन विद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला आणि विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या तसेच विद्यालयाचे क्रीडा शिक्षक घुगे ए.पी. यांनी अथक परिश्रम घेऊन विद्यार्थी (खेळाडूंना) योग्य असे मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचाही यावेळी गुलाब पुष्प देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विवेकानंद कॅन्सर अँड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलला दिली भेट

लातूर (प्रतिनीधी) : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. २३ ऑक्टोबर रोजी दुपारी लातूर शहरातील एमआयडीसी परिसरातील विवेकानंद मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर लातूरच्या विवेकानंद कॅन्सर अँड सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलला भेट देऊन पॅथॉलॉजी कक्ष क्ष कीरन कक्ष, लिनिअर अक्सिलेटर कक्ष, शस्त्रक्रियागृह संकुल व विवेकानंद रुग्णसेवा सदन येथील सभागृह भोजन कक्ष, सामूहिक महिला कक्ष, सहनिवास क,क्ष विशेष निवास कक्ष, आदीची पाहणी



करून अत्याधुनिक वैद्यकीय सोयीसुविधा आपल्या भागात विवेकानंद रुग्णालयाने उपलब्ध केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

या दरम्यान विवेकानंद मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक अध्यक्ष पद्मभूषण डॉ.अशोक कुकडे यांच्याशी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी सध्याच्या वैद्यकीय सोयीसुविधा त्या समोरील अडचणी सामाजिक प्रश्र्न आदी विविध विषयावर त्यांच्याशी चर्चा केली.

यावेळी विवेकानंद कॅन्सर अँड सुपरस्पेशलिटी हॉस्पिटलचे डॉ.ब्रिजमोहन झंवर, डॉ.प्रमोद टिके, डॉ. बाजीराव जाधव, डॉ.निखिल घड्याळ, डॉ. पाटील, डॉ. अर्जुन मंदाडे, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. वेदप्रकाश माकणीकर, डॉ.आरती झंवर, अनिल जवळेकर रुग्णालयाचे अधिकारी कर्मचारी,रुग्ण, नातेवाईक उपस्थित होते.

# विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व उच्चशिक्षित बुद्धिवान लोकांनी करावे!

समाजातील सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिवान बुद्धिजीवी लोकांच्या नेतृत्वाखाली कोणताही समाज सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करतो आणि वैचारिक दृष्टीने प्रगल्भ विचारसरणीचा बनतो असा संकेत असतो कारण बुद्धिवान लोकं विविध विषयात सर्वगुणसंपन्न ज्ञानसंपन्न असतात उच्चविद्याविभूषित लोकांना खरं खोट्या मधील फरक समजतो कारण त्यांना विविध विषयात चिकित्सक पध्दतीने अवलोकन करण्याचे ज्ञान अवगत असते हे कोणीही नाकारणार नाही समाजाची दिशाभूल टाळण्यासाठी बुद्धिवान लोकांनी समाजात जागृत असणे गरजेचे असते.

विश्र्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक असल्याने समाजात ओबीसी संदर्भात विविध विषयांवर समाज जागृती निर्माण करण्याची नितांत गरज असते याचा विसर मात्र सुतार समाजातील स्वयंघोषित पुढाऱ्यांना तथाकथित समाज नेत्यांना पडु नये.समाजात पाखंडवाद,कर्मकांड,अंधश्रद्धा तसेच काल्पनिक थोतांड इत्यादी विषयावर ओबीसी सुतार समाजात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्याची नितांत गरज असते यासाठी बुद्धीजीवी लोकांनी समाजात नेतेगिरी करणाऱ्या सर्वच नेत्यांना सोबत घेऊन पुढाकार घेऊन राज्यभरात ठिकठिकाणी समाज प्रबोधनाचे कार्यक्रम राबवावे.

घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कल्पक दूरदृष्टीने विचार करून संविधानात ओबीसी प्रवर्गातील लोकांसाठी विशिष्ट कलम समाविष्ट करून न्यायिक दृष्टीने ओबीसींना शैक्षणिक,सामाजिक,राजकीय हिस्सेदारीसाठी मार्ग मोकळा करून दिलेला आहे.मात्र त्याचा योग्य वापर सुतार समाजात पुढारपण करणारे पुढारी,स्वयंघोषित सुतार समाज नेते करतांना दिसत नाहीत.स्वयंघोषित नेतेगिरीचा डांगोरा पिटणाऱ्या तथाकथित पुढाऱ्यांनी आत्मचिंतन करणे गरजेचे आहे राज्यातील सुतार समाजाची लोकसंख्या लक्षणीय असल्याचे समाजातील सोशल मीडियावरच वाचण्यात आलेले आहे.

विश्र्वकर्मीय आदर्श ओबीसी सुतार समाजात आपल्या हुशारीने नेतेगिरी करणारे तथाकथित स्वयंघोषित समाज पुढारी समाज नेते ओबीसी संदर्भात आरक्षण आणि जनगणना,राजकीय हिस्सेदारी बद्दल इत्यादी महत्वाच्या समाजहित विषयावर समाजात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करतांना दिसत नाहीत समाजात ज्या गोष्टींची गरज आहे त्याकडे सुतार समाजातील स्वयंघोषित समाज नेते स्वयंघोषित पुढारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतांना जाणवते स्वयंघोषित समाज नेते फक्त स्वतःच्या नावासाठी मोठेपणासाठी हापापलेले आहेत यांच्या हापापलेपणाचा फटका सुतार समाजाला बसतो.याकडे सुतार समाजातील बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धिवान बुद्धिजीवी सुशिक्षित उच्चशिक्षित सर्वगुणसंपन्न गुणवत्ता असलेल्या लोकांनीच लक्ष देणे गरजेचेच आहे अन्यथा विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज खऱ्या सामाजिक वैचारिक चळवळी पासून कोसो दुर जाईल याला प्रामुख्याने जबाबदार कोण आणि याची नैतिक जबाबदारी कोणाची याचा विचार करण्याची नितांत गरज आहे बुद्धिवान सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिजीवी समाज चिकित्सक पद्धतीने अवलोकन करतो आणि नेहमीच जागरूक असतो.

समाजातील सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिवादी बुद्धिजीवी बुद्धिवान लोकं जागृत असतील तर कोणताही स्वयंघोषित पुढारी स्वतःला समाज नेता समजणारा नेता सुतार समाजाची दिशाभुल अजिबात करणार नाही.विश्र्वकर्मीय सुतार समाजातील बुद्धिजीवी वर्ग जागृत असेल तर समाजाची दिशाभूल होणार नाही. समाजातील बुद्धिवान लोकांनी नेहमीच जागरूक असायला पाहिजे बुद्धिवादी लोकांनी आपल्या समाजहितासाठी शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर आपल्या सर्वगुणसंपन्नतेचा उपयोग आपल्या समाजाला योग्य मार्गदर्शक म्हणूनच करावा आपली परखडपणे लेखणी आणि तल्लख बुद्धी सुतार समाजात जागृती निर्माण करण्यासाठी वापरावी.बुद्धिजीवी वर्गाने आपली तल्लख बुध्दी आपल्या समाजहितासाठी वापरावी समाजात जर काही बोटावर मोजता येतील अशी मोजक्याच लोकांची समाज टोळी ओबीसी सुतार समाजाची कोणत्याही सामाजिक विषयावर निव्वळ स्वतःच्या नावासाठी अट्टाहास पुर्ण करण्यासाठी आणि दिशाभुल करीत असेल तर बुद्धिवान लोकांनी परखडपणे लिहिणे बोलणे गरजेचे असते समाजाची दिशाभूल होऊ नये यासाठी पुढाकार घेणे गरजेचे असते कारण समाजातील बुद्धिवान समाज जागरुक असतो.

बुद्धिवान लोकांनी सत्यवादी विचार व्यक्त करावे परखड बोलावे परखडपणे लिखाण करावे एकंदरीत आपल्या बुद्धिप्रामाण्यवादी, बुद्धिजीवी, बुद्धिमान,गुणवत्ताधारक,बुद्धिवादी असल्याचा वापर आपल्या समाजासाठीच करावा दिशाभूल हद्दपार करण्यासाठी प्रयत्न करावे.समाजातील बुद्धिजीवी बुद्धिवादी बुद्धिवान लोकांनी आपल्या सुशिक्षित आणि उच्चशिक्षित शिक्षणाचा,बुद्धीचा आणि बुद्धिमत्तेचा उपयोग आपल्या समाजाची दिशाभुल होऊ नये यासाठी समाजात उत्तम मार्गदर्शन करण्यासाठी उत्तम मार्गदर्शक म्हणूनच आपली भुमिका वठवावी कारण बुद्धिवान लोकांचा प्रभाव समाजमनावर पडतो बुद्धिवान लोकांचा जनमानसात प्रभाव पडतो.अन्यथा ओबीसी सुतार समाजाची वाटचाल भरकटलेल्या दिशेने जाईल,समाज दिशाहीन होईल.याचे दूरगामी परिणाम समाजातील भावी पिढीला भोगावे लागतील भावी पिढीचे वैचारिक नुकसान होणार नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे समाजाच्या हितासाठी याचा विचार करणे गरजेचे आहे.समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून आपली सामाजिक वैचारिक आणि नैतिक जबाबदारी समजून राज्यस्तरीय सुतार सामाजिक क्षेत्रात वैचारिक बीजारोपण करण्याची नैतिक जबाबदारी हि सुद्धा समाजाचा एक घटक म्हणुन सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिवान लोकांनी समजून ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व करावे. विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बांधव म्हणून सांगावेसे वाटते कि,समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि भावी पिढीचे वैचारिक नुकसान टाळण्यासाठी विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व उच्चशिक्षित बुद्धिवान लोकांनी करावे.

**प्रमोद सुर्यवंशी चिखली मातृतीर्थ**
**बुलडाणा:-८६०५५६९५२१.**

## मुस्लीम व्यक्ती करू ....

**(पान २ वरुन)** ...लग्नाची नोंदणी करण्यास नकार दिल्याचा दावा या जोडप्याने कोर्टात दाखल केलेल्या याचिकेत केला आहे. त्यांचा युक्तिवाद असा होता की राज्य कायद्यांतर्गत 'विवाहाची व्याख्या' फक्त एकाच विवाहाची नोंदणी करण्यास परवानगी देते. न्यायालयाने म्हटले आहे की, मुस्लिम पर्सनल लॉनुसार मुस्लिम पुरुषाला एकाच वेळी चार बायका ठेवता येतात. न्यायमूर्ती बी.पी. कुलाबावाला आणि सोमशेखर सुंदरसन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, मुस्लिम व्यक्तीला तिसरा विवाह नोंदवण्यापासून रोखणाऱ्या विवाह नोंदणी कायद्यात काहीही आढळले नाही. सुनावणीच्या १० दिवसांच्या आत विवाह नोंदणी मंजूर किंवा नाकारण्याचा तर्कसंगत आदेश द्यावा, असा आदेश न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाने याचिकाकर्त्याला दोन आठवड्यांत ठाणे महापालिकेत सर्व कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी आदेश देताना न्यायालयाने म्हटले आहे की, याचिकाकर्त्याच्या दुसऱ्या लग्नाची नोंदणी करणारे अधिकारी आता महाराष्ट्र मॅरेज ब्युरो रेग्युलेशन अँड मॅरेज रजिस्ट्रेशन कायद्यांतर्गत झालेल्या लग्नाचा दाखला देत तिसऱ्या लग्नाची नोंदणी करत आहेत, ही विचित्र विडंबना आहे.

# आज माझ्यातला भीम इथं मीच केला उणा दोष देऊ कुणा , दोष देऊ कुणा ?.

जरी संकटाची काळरात होती
तरी भिमराया तुझी साथ होती
तुझी तेवण्याची सुरुवात होती
प्रकाशात माझी पिढी न्हात होती

महाकवी वामनदादा कर्डक यांचं हे गीत आमच्या जीवनाची पूर्वपीठिका सांगून जाते. म्हणूनच आम्ही सुध्दा आमच्या जगण्याचा श्र्वास ऑक्सीजन बाबासाहेबाना समजतो कारण हजारो वर्षांचा इतिहास सांगतोय आम्ही गुलाम होतो आणि शूरवीर सुद्धा होतो.या जात्यांध गुलामगिरीला नष्ट करण्यासाठी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवाची पर्वा न करता.प्रणांकित प्रचंड संघर्ष करून आम्हाला स्वाभिमानी माणसाचं जीवन बहाल केलं.हे मानूसपणाचं जीवन सहाजा सहजी मिळालेलं नाही.या मागे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण कुटुंबाचा त्याग आहे. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर माणसाला माणूसपण मिळण्यासाठीचा संघर्ष करीत असतांना प्रचंड जीवन झिजवित होते.वडील रामजी बाबांचं निधन, लाडक्या मुलाचं निधन आणि उपाशीपोटी राहून बाबासाहेबांचा संसार चालविणारी नऊ कोटीची माय माऊली माता रमाईचं निधन या कडे बाबासाहेबांचं दुर्लक्ष झाले असे नाही.पण समाजासाठी प्रचंड अभ्यास,संघर्ष,देश विदेश दौरा अख्या देश समाजपरिवर्तना साठी भ्रमण करणं हे ही आवश्यक होतं.म्हणून त्यांच्या कुटुंबाची झालेली होरपळ आणि आपलं जीवन फुलवण्यासाठी त्यांच्या कुटुंबाची झालेली हानी ही प्रचंड प्रमाणात आहे.म्हणून याची भरपाई आपण कशी भरून देणार? हे समाजाने समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.पण आपल्याच समाजातील काही महाभाग एकाच वर्गाचे अतिशहाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घराण्याला प्रस्थापितांच्या सांगण्यावरून मुद्दाम जाणीवपूर्वक टार्गेट करून खोटे नाटे आरोप करून सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या अकलेचे तारे तोडत असताना आपल्याला दिसून येतात.ही आपल्या साठी अत्यंत लाजीरवाणी बाब आहे.

मित्र हो ! समाजमनात प्रचंड जातियद्वेश कलह असताना समाजातील प्रतिभावंत कवी, लेखक,पत्रकार,समाजसेवक,विचारवंत,साहितियक यांनी गप्प बसणे म्हणजे षंडाचे लक्षण होय. आपल्यातील काँग्रेस + भाजपच्या लाभार्थी गद्दार महा विचारवंतांना सोडून दया त्यांना त्यांचे काम करावे लागते.कारण त्यांना त्यांची वैचारिक सालगडी म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते.

आज आपल्या समाजात अनेक प्रश्र्न भयावह असताना आंबेडकरी चळवळीला मजबूत करण्याचे सोडून हे काही महाभाग आंबेडकरी घराण्याच्या विरोधात जाणिवपूर्वक बोलतांना दिसतात.या वेळी त्यांची जीभ का झिजत नाही. त्यांच्या बुद्धीची मला कीव येते.अरे काही ही कारण नसतांना आपल्या घरात ओढून ताणून आणलेले वाद किती तानायचे याचे तरी भान ठेवा नाही तर येणारी पिढी तुम्हाला कधीच माफ करणार नाही.कारण बाबासाहेबांचा संघर्ष हा एका रात्रीतून जन्माला आला नाही.म्हणून याची जाणीव ठेऊन आपण वागायला पाहिजे.

गेल्या कित्येक वर्षांपासून श्रद्धेय ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे स्वतःच्या जीवाची पर्वा न करता आंबेडकरी समूह,आदिवासी समूह,भटक्या विमुक्त जाती समूह,ओबीसी समूह,मुस्लिम समूह हा सत्तेत कसा बसविता येईल यासाठी त्यांचे सोशल इंजिनिअरिंग चालू आहे.हे आपण समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.परंतू हे सर्व करीत असताना आपल्यातील काही स्वतःला विचारवंत समजणारी मंडळी प्रस्थापितांची लाभार्थी होऊन बाबासाहेबांच्या विचाराने श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर चालत असताना त्यांच्या सत्ता संपादणाच्या लढ्यात अडथळा निर्माण करतात. ही प्रवृत्ती अत्यंत घातक आहे. आंबेडकरी चळवळीची झुल पांघरून आपल्याच माणसाला फसवतात. ही खूप मोठी शोकांतिका आहे.

हे आता कुठं तरी निवडणुकीच्या माध्यमातून समाजाच्या समोर आले आहे. एकीकडे आंबेडकरी चळवळीच्या किंवा आंबेडकरीवादाच्या पोट तिडकीने गप्पा करून आपल्या भोळ्या भाबड्या समाजासमोर विचारवंताच्या रूपाने उभे राहून हळूच आपल्या जीवनाचे अस्तित्व नेस्तनाबूत करणाऱ्या शत्रूच्या गोटात जाऊन सामील होऊन त्यांच्याच इशाऱ्यावर आपल्याच समाजाची दिशाभूल करून ऐन मोक्याच्या वेळेला बाळासाहेबांच्या वंचित बहुजन आघाडीच्या चळवळीला विरोध करणारी ही माणसं खरोखर आपली होऊ शकतात काय? म्हणजेच आपल्याच माणसाने जीवलाऊन घेतलेला जीव याचा संताप समाजात होत आहे हे साहजिकच आहे.

श्रद्धेय ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांचं राजकारण आणि समाजकारण म्हणजे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणारे आहे.हे प्रथम अभ्यासकांनी समजून घेणे गरजेचे आहे.कारण ज्यांना बाबासाहेब समजले त्यांनाच बाळासाहेब समजतील हे सूर्य सत्य आहे. बाळासाहेब समाजातील सर्व वंचित घटकांना जवळ करून आपला राजकीय प्रवास मर्गक्रमित करीत आहेत.मोठ्या कष्टाने ते अठरा पगड जात समूहातील प्रत्येक माणूस जोडून त्याला त्याचं प्रतिनिधित्व कसं प्राप्त करून देता येईल या साठी त्यांची धडपड प्रचंड प्रमाणात आहे. मग यात बाळासाहेबांचे चुकते कुठे? का परिवर्तन करणे हा गुन्हा आहे का ? मग समाज माध्यमात बाळासाहेबांच्या बदनामीचे षडयंत्र कोण चालविते ? हा एक महत्वाचा प्रश्र्न आहे. या मागचे दुसरे तिसरे कोणी नसून आपल्यातील काही फितूर लेखक,कार्यकर्ते,काँग्रेस भाजप कडून पाकीट घेऊन मोकळे होतात आणि बाळासाहेब आणि त्यांच्या पक्षाला बदनामी करण्यासाठी नांदी लागतात.मूळ शत्रू समोर येत नाही.तो आपल्याच माणसाच्या हातून आपली हत्या करायला निघाला म्हणून बाळासाहेब जीव तोडून सांगतात. मी हारात नाही इथं तुम्ही मला हरवता. हे बाळासाहेबांचे शब्द आपल्याला शरमेने मान खाली घालवायला लावतात.केवळ या गद्दार लोकांमुळे म्हणून समाजाने हे सर्व समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.समाजात तसे काही आदरणीय लेखक मंडळी आहेत. ते आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी आज ही धडपडत आहेत.त्यांच्या प्रति मी नतमस्तक होतो.पण जी काही तथाकथित आंबेडकरी चळवळीची झुल पांघरून समाजाची फसवणूक करतात त्यांच्या बद्दल समाजाने संताप व्यक्त करावा की नाही ?

जाणिव पूर्वक बाळासाहेबांची बदनामी ही निवडणुका तोंडावर आल्या की केल्या जाते.या सर्व गोष्टींचा समाजमनात संताप आहे असे नाही. पण आपलेच घरभेदी इतक्या टोकाला जातात की त्यांच्या घराण्याची इभ्रत काढल्या जाते. ही चूक आपण किती दिवस सहन करणार आहोत.बाळासाहेब यांच्यावर टीका केली जाते की ते भाजप ची बी टीम आहे,हे म्हणणारे आघाडीवर कोण तर आपलेच याही पुढे जाऊन ते थांबत नाहीत तर बाळासाहेब हे हिंदू देव देवतांची पूजा आरती करतात. यांच्याकडे या व्यतिरिक्त कोणतेच कारण नसते.या विषयी मला माझ्यातील विचारवंत,कार्यकर्ता, समाज बांधव यांना सांगावेसे वाटते. अरे बाबा श्रद्धेय ड.बाळासाहेब आंबेडकर हे एक राष्ट्रीय नेते असून लोकनेते आहेत.बाबासाहेबांचे संविधान आपल्या देशात आहे.

या संविधानाने आपल्याला लोकशाही दिलेली आहे.या मुळे तुम्हाला तुमचे राजकीय गणित जुळवायचे असतील तर सर्व धर्म पंथाच्या कार्यक्रमात तुम्हाला जावेच लागेल.हा फार मोठा संशोधनाचा विषय नाही आहे. दुसऱ्या पक्षातील लोक त्यांच्या फंडातून किती तरी बुध्द विहार आपण बांधून घेतले.म्हणून आपण त्या ठिकाणी बुद्ध वंदना घेतोच ना की नाही.मुळात काहीच कारण नसतांना ओढून ताणून आरोप निर्माण करणे प्लीज थांबवा मित्रांनो.हे आपल्या हिताचे आहे. जाणिव पूर्वक बाळासाहेबांची आणि वंचित बहुजन आघाडीचा फेक नेरेटीव्ह समाजात पसरवून दिशाभूल करतात.मला आपल्या सर्वांना एकच सांगायचे आहे की तुम्हाला आंबेडकरी नेतृत्व मारायचे की जिवंत ठेवायचे आहे ?

माझ्या तमाम माय बाप आंबेडकरी समाजाला मला सांगायचे आपल्या समाजातील जे काही मोजकेच लाचार समाज नासविणारे काही लेखक,काही कार्यकर्ते,काही स्वार्थांध संघटना आहेत.यांनी कृपया आपल्या पूर्वजांचा इतिहास अभ्यासून राजकारण करा, स्वतःच्या स्वार्थासाठी समाजाला मारू नका नाही तर हा आंबेडकरी समाज तुम्हाला कधीच माफ करणार नाही.ऐवढे मात्र तुम्ही लक्षात ठेवा.काय तर विचारवंताच्या घरा समोर निदर्शने केली म्हणून निषेध ची एक पोस्ट व्हायरल होत आहे. या मध्ये ज्याला काहीच माहीत नाही तो ही निषेध नोंदून मोकळा होत आहे. अरे बाबा आपण निषेध कोणाचा करतो,काय म्हणून करतो हे तर जाणून घ्या हे कश्यासाठी तुम्ही नौटंकी करता.या माध्यमातून बाळासाहेबांची आणि वंचित कार्यकर्त्यांची प्रचंड प्रमाणात बदनामी करण्याचे दिसून येते.हे तुम्ही कुणाच्या इशाऱ्यावर करत आहात.हे सर्व समाजाला माहीत आहे.एवढा समाज दुधखुळा नाही आहे.

मला इथे पुन्हा आवर्जून सांगायचे आहे. श्रद्धेय ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांचा कार्यकर्ता हा आंबेडकरी चळवळीची निष्ठा आणि भूमिका स्पष्ट असलेला कार्यकर्ता आहे.तो सभ्य प्रवृत्तीचा आहे.जाणिव पूर्वक ट्रोल करत नाही. तो बोलत ही असेल तर पुरावा सादर करून बोलतो.मग त्याचे बोलणे तुम्ही येवढे मनाला का लाऊन घेता ? चुकीला चूक नाही म्हणावे तर काय म्हणावे ? याही गोष्टीचा तुम्ही निषेधाच्या बातम्या झळकावत असाल तर निषेध ही तुमचा निषेध केल्याशिवाय राहणार नाही. कारण श्रद्धेय ॲड.बाळासाहेब आंबेडकर समजून घेण्यासाठी प्रथम तुम्हाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर समजून घ्यावे लागतील. बाळासाहेब समजण्यासाठी वंचित बहुजन आघाडीची भूमिका समजण्यासाठी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक विचारांपैकी पुढील एक विचार मी त्यांचा स्पष्ट करतो. बाबासाहेब म्हणतात.तुमच्यातच नव्हे तर या देशात एक विचित्र विकृती दिसून येते.ती ही की आज झाड लावले की त्यास दुसऱ्या दिवशी फळ खावयास आले पाहिजे असे लोकांना वाटते. राजकारणात अशी अपेक्षा धरणे चूक आहे. तुम्हाला सत्तेचे फळे चाखावयाची असल्यास वंचित बहुजन आघाडीला बळकट करण्यासाठी आपल्या सर्व बहुजन व आंबेडकरी अनुयांनी झटले पाहिजेत.बाळासाहेबांना सहकार्य करून आंबेडकरी नेतृत्व गतिमान करता येईल तरच आपण या समाजात स्वाभिमानाने जीवन जगणार आहोत.नाही तर महाकवी वामनदादा कर्डक सांगून गेले

माझ्यातला भीम इथं मीच केला उना
दोष देऊ कुणा दोष देऊ कुणा ?

आपल्याला आंबेडकरी नेतृत्व टिकवायचे असेल तर चला बाळासाहेबांना साथ देऊया.

**देवानंद पवार.**
**९१५८३५९६२८,औरंगाबाद संभाजी नगर.**

# बौद्ध समाजाला व त्यातल्याच शिकलेल्यांना कोणं दोष दिला?

ज्या बौद्ध बांधवांना वाटते की आम्ही एकूणच सर्व बौद्धांना किंवा त्यातील सर्वच शिकलेल्या सवरलेल्यांना शिव्या शाप देतो असा जो काही आमच्या बांधवांनी गैरसमज करून घेतलेला आहे त्यांना आम्ही नम्रपणे सांगू इच्छितो की,समाजातील काही समाजकंटक प्रस्थापित राजकारण्यांची स्वार्थासाठी दलाली करतात तेव्हा अशातल्या स्वतःला बौद्ध म्हणून घेणाऱ्यांना व समाजात जे उच्च विद्या विभूषित आहेत आणि मोठी नामवंत लेखक साहित्यिक मंडळी जी आहे परंतु ते स्वजणांच्या पक्षाला सोडून परपक्षाला जाऊन मिळतात व तिथून ते स्वजनांच्या पक्षाच्या छावणीवर प्रस्थापितांकडून मिळालेल्या आर्थिक लाभामुळे जे हल्ले चढवितात त्या सर्वांची मी शब्दसुमनांनी रोज पूजा करावी! आणि तसेच ते उलट ॲड.बाळासाहेब आंबेडकरांवर लावतात तेच आरोप खरे आहेत म्हणून त्यांची जिल धरावी अशी जर काही आमच्या बौद्ध बांधवांची इच्छा असेल तर त्यांची ही बेलगाम इच्छा माझ्याकडून तरी कदापी पूर्ण होणे शक्य नाही! कारण की ही आंबेडकरी चळवळीच्या विरुद्ध बकवास करणारी भिकार चोटमंडळी काल ज्या बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना त्रासदायक ठरत होती हे त्याच व्यक्तिगत कारणाने असंतुष्ट असलेल्या व स्वतःला पुढारी म्हणून मिरवण्यास हपापलेल्या लोकांनी संस्कारातून निर्माण केलेली देण आहे त्यामुळे यांना आमच्यासारख्या कडून तरी समाजावर तसेच मोकाट चरू दिल्या जाणार नाही!

त्यांची आम्ही जर आज तिखट शब्दांनी बोलवण केली नाही तर हे लोक इतरांनी यांच्या तोंडी घातलेले उष्टे साऱ्या समाजाला चारून भ्रष्ट मार्गाने नेण्याचा प्रयत्न करीत राहतील तर अशांना आम्ही का म्हणून बरदास्त करायचं? ज्या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या हातातील आमचे जे काही लोक कटपुतली झालेत त्यानुसार ते प्रस्थापित निंदकांची रि ओढत वंचित बहुजन आघाडीला भाजपची बी टीम म्हणतात परंतु त्यांना भाजपला सत्तेत जाण्यासाठी बाहेरून पाठिंबा देणारी राष्ट्रवादी काँग्रेस जर भाजप ची बी टीम वाटत नाही त्याचप्रमाणे भाजप काँग्रेस एकमेकांना धादांत मते देऊन एकमेकांना गुपचूप निवडून आणतात परंतु बाळासाहेब आंबेडकर नको म्हणून वाटेल ते करायला जर तयार असतील तर अशा परिस्थितीतही या आमच्यातील महाभागांचे डोळे उघडत नसतील तर मी तर म्हणतो शिव्या शापच काय? त्यांना तर खऱ्या अर्थाने विचारी माणसाने पण जोड्याने बडवले पाहिजे! मात्र उलट अशांसी सुसंवाद साधला पाहिजे! असे ज्यांचे म्हणणे आहे आम्ही त्यांना एवढेच सांगू इच्छितो की ज्यांची इतरांचे जोडे उचलण्याची निगरगट्ट मानसिकता बनलेली आहे अशा वृत्तीच्या लोकांना तुम्ही रात्रंदिवस पंचांग प्रणाम केला तरी चालेल भाऊ आम्ही मात्र अशा घर बुडव्यांना कावडीची सुद्धा किंमत देणार नाही. याचे कारण असे की डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे जर बाळासाहेबांचा विचार केला तर आज सर्व समावेशक नेतृत्व तेच ठरू शकतात! इथे आज नेतृत्वाविषयी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत कसे होते हे जरा बघूया! ते म्हणतात कोणत्याही राजकीय पक्षाला कार्यक्रम, शिस्त व साधनसामुग्री यांची जितकी गरज असते,त्याहूनही त्याला आपल्या कर्तुत्वाने लोक मताला भारून टाकणाऱ्या नेत्याची अधिक गरज असते. (डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे पा.नं.२२०) असे बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे जर या कसोटी ला इतर कोणत्याही बौद्ध नेतृत्वाच्या तुलनेत जर बाळासाहेब उतरले नसते तर गोष्ट वेगळी असती परंतु सर्वच नेते इतरांच्या ओंजळीने पाणी पिणारे निघाल्याचे सिद्ध झाले असताना मग बाळासाहेबांवर शिंतोड उडवण्यापेक्षा त्यांना सहकार्य करण्याची गरज असताना जर कोणी दलाली करत असेल आणि या दलालांना जर कोणी सुसंवाद साधून जवळ घ्या म्हणत असेल तर असा आत्मघात करणे खऱ्या स्वाभिमानी व आंबेडकरवादी कार्यकर्त्याला ते शक्य आहे का? याचे उत्तर आमच्या बांधवांनेच द्यावे! ही सविनय अपेक्षा!

जय भीम जय भारत

**जीवन बोदडे**
**९६८९२६८६२०,भांबेरी,जिल्हा बुलढाणा**

# काही आठवणी झाडाच्याही...

वरील छायाचित्रात आमच्या अंगणातील जे आवळीच्या झाडाचे दृश्य आहे ते तुम्ही पाहिले असेलच.खरोखरच किती विलोभनीय दृश्य आहे ना ! या मनोहारी दृश्याचा आनंद आम्ही सारेच घेत असू आणि घेत आहोतही पण यापुढे हे दृश्य आम्हांला कधीच दिसणार नाही.त्याचं कारण म्हणजे झाडाला सुद्धा आयुष्य असतं आणि या झाडाचं आयुष्य देखील संपल्यातच जमा आहे.या झाडाचा अंत होत चालला आहे.ते खूपच वाळले आहे.आम्हां कुटुंबीयांना,वाडीतील मंडळींना तसेच त्याच्याखाली विसाव्यासाठी बसणाऱ्या वाटसरूंनाही या झाडाला असे पाहून खूप दु:ख होत आहे.हे झाड माझ्या जन्मापूर्वीचं म्हणजे अगदी बाबांच्या लहानपणीचं.बाबांनी या झाडाला छान ओटा बांधला आहे. पावसाळा संपल्यानंतर अंगणाबरोबरच आई या ओट्यावरही छान सारवण करीत असे आणि मग या ओट्यावरच गप्पागोष्टी रंगायच्या मग त्या मोठ्यांच्या असोत वा आम्हां लाहानग्यांच्या.आम्ही मुले तर मुद्दाम या ओट्यावर बसायचो म्हणजे गप्पा मारता–मारता अंगणात पडलेले आवळे उचलायचे आणि ते तिखट–मीठासोबत डोळे मिटून मांजरांप्रमाणे खायचे.या आवळ्यांच्या वाटण्यांवरून कधी कधी भांडणही व्हायची. पण तो आवळा खाल्ल्यानंतर पाणी पिण्याची मजा होती ती काहीशी औरच! पाणी इतकं गोड लागायचं की पुन्हा पुन्हा आवळा खाऊन पाणी प्यावं असं सारखं सारखं वाटायचं.

सकाळी सकाळी या झाडावर बसणाऱ्या चिमण्यांचा चिव चिवाट ऐकू यायचा.मी तर दररोज शाळेत जाताना या झाडाखाली बसूनच आईला वेण्या घालायला सांगायचे. दिवाळीच्या वेळी आवळे लागायला सुरुवात व्हायची मग मी दररोज शाळेत आवळे न्यायचे.शाळेत पोहोचतेय तोवर मैत्रिणी पुढे येऊन पहिलं आवळ्यांना विचारायच्या आणि आवळे खाण्याचा मनसोक्त आनंद घ्यायच्या.त्यातले काही आवळे मी माझ्या गुरुजी व बाईंनाही द्यायचे आणि तेही खूप आनंदाने घेऊन खायचे.तेव्हा मी प्राथमिक शाळेत होते.वाडीतील मंडळी म्हणा,वाटसरू म्हणा,किंवा माझ्या मैत्रिणी आणि गुरुजी बाई यांनीही या आवळ्याची चव चाखलेय.

आवळ्याचे खूप उपयोग आहेत.केस वाढीसाठी खूप उपयुक्त म्हणून आम्ही तर हावऱ्यासारखे आवळ्यांवर तुटून पडायचो.या आवळ्यांचा आकार अगदी मोठाही नाही आणि अगदी लहानही नाही मध्यम आकाराचा हा आवळा आमच्या घरात व वाडीतही आवळा सुपारी बनवण्यापासून,मिठात ठेवून खाण्यापासून ते अगदी मोरावळा बनवण्यापर्यंत उपयुक्त ठरला.

हे झाड खूप मोठं होतं.याच्या सावलीत खूप बरं वाटायचं.कधी माझा अभ्यास येथे व्हायचा, तर कधी आम्हा मुलांच्या गप्पा–गोष्टी.वानर आले की आम्हां मुलांची चंगळ व्हायची.कारण वानर खूप आवळे पाडून जायचे आणि आम्ही ते खाण्याचा मनसोक्त आनंद घ्यायचो.तुळशीचे लग्न असल्यावर गावातील खूप माणसं आमच्याकडे आवळे मागून घेऊन जायची.आमची मांजर डॉली आणि गोल्डी या झाडावर चढून आम्हांला कसरत करून दाखवायची.त्यावर खारुताई चढली की मग तिची आणि मांजरांची लपाछपी सुरू व्हायची.त्या लपाछपीत मांजर कधी कधी खाली पडायची पण पुन्हा उठून झाडावर चढायची.दुर्दैवाने ती मांजरही आता आमच्यात नाहीत आणि हे झाडे यानंतर आमच्यात नसेल.जेव्हा या झाडावर विविध प्रकारचे पक्षी बसायचे तेव्हा ते नव्याने बहरलेलं वाटायचं आणि हे अभूतपूर्व दृश्य आम्हांला घरातील पलंगावर पडूनही पाहता यायचं.हे दृश्य पाहून मनाला खूप छान वाटायचं.या झाडाची पावसाळ्यात काही रोपेही रुजली आहेत.त्यातील एक रोप बाबांनी आमच्या सारनाथ बुद्ध विहाराच्या खालील बाजूस व एक रोप विहिरीच्या परिसरात लावले आहे येणाऱ्या ऑगस्टमध्ये मीही माझ्या वाढदिवसानिमित्त या झाडाच्या जागेवर एक त्याचेच रोप लावणार आहे.पण ते आवळे खायला आम्हांला साधारणतः दहा वर्षे तरी वाट पाहावी लागेल.पण आता कितीही झाडे लावली तरी या झाडाची सर कोणत्याच झाडाला येणार नाही.या झाडासोबत आम्हां साऱ्यांच्या खूप आठवणी जोडलेल्या आहेत.

**निशा श्रीपाल जाधव-९७६४६६४७११**
**फुणगूस,ता.संगमेश्र्वर,जि.रत्नागिरी.**

**तत्पर ..**

प्रतिपक्षांत पडेफूट
प्रयास करा सत्वर
येवू द्या बंडखोरांना
स्वागता सारे तत्पर
पायघड्या ये गड्या
फुलांनी भरले डंपर
घे तिकीट डायरेक्ट
ऑफरझकास बंपर
दार उघडूनि तय्यार
गाडी घेऊनि शोफर
मान सन्मान भरपूर
भले असू द्या लोफर
सुसंधी ठोठावते दार
करून घ्यावा वापर
माल मसाला भरता
पिक्चरहीट हो सुपर
गुलाल उधळा रस्त्या
भरभरुन आले टिपर
नाराजीनामा प्रसिध्द
राजीनाम्याचा दे पेपर
आपल्यापक्षां येणारां
देणारं फाडून छप्पर
बाहेर जाणारा तेवढा
रे असतो गद्दारढप्पर

**अवघड ..**

बलाढ्य पक्ष एकत्र
परिक्षा बने अवघड
चालक हवे निष्णात
वाहनेचाले अवजड
प्रत्येक पक्षाला वाटे
राखावे खात्रीचे गड
मांडत राहती ठासून
मते सगळी परखड
माघार घेणार नाही
अपेक्षा सर्वा धाकड
वरून हसून खेळून
मनातून आगपाखड
उमेदवारी आवश्यक
जरी म्हातारेजखखड
खात्रीचा मतदार संघ
आमची घट्ट पक्कड
दुभता विभाग द्यावा
गाय नको ती भाकड
जिंकायची हवीखात्री
नको रे बळीचेबोकड
सोडवा गुंता लवकर
नगारे वाजे खड खड
जाहीरहोणार तारखा
छातीत होई धडधड

**हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

# गरोदरपणात केस गळण्यामागचे कारण काय? कंट्रोल करण्यासाठी करा खास उपाय

गरोदरपणात महिलांच्या शरीरात अनेक बदल दिसून येतात. या काळात हार्मोन्समध्ये चढ-उतार झाल्यामुळे समस्यांना सामोरे जावे लागते. अनेकदा स्त्रिया गरोदरपणात त्यांच्या केसांची खूप काळजी करतात. गरोदरपणात केस गळण्याची समस्या ही एक सामान्य समस्या आहे. ही समस्या काहींना जास्त आणि काहींना कमी प्रभावित करते, परंतु सर्व महिलांना याचा सामना करावा लागतो. गरोदरपणात केस गळण्याच्या स्थिती टेलोजन इफ्लुव्हियम नावाने ओळखली जाते. महिला योग्य काळजी घेऊन केस गळण्याची समस्या थांबवू शकतात.

गरोदरपणात का गळतात केस?

गरोदरपणात केस गळण्याची समस्या ४० ते ५० टक्के महिलांना होते. काही महिलांवर या समस्येचा अधिक परिणाम दिसू शकतो आणि काही महिलांना कमी परिणाम दिसू शकतो. साधारणपणे गर्भधारणेच्या ३ ते ४ महिन्यांनंतर केस गळण्याची समस्या सुरू होते. ही समस्या तुम्हाला काही काळासाठी त्रास देते. साधारणपणे, ६ ते १२ महिन्यांच्या गर्भधारणेनंतर, ते स्वत:च नियंत्रणात येतात. गरोदरपणात शरीरातील इस्ट्रोजेनची वाढती पातळी केसांच्या चांगली वाढ होण्यास परिणामकारक असतात. अति तणावामुळेही ही स्थिती उद्भवते. याशिवाय लोह, जीवनसत्त्वे आणि खनिजांची कमतरता हे देखील याचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे समस्या टाळण्यासाठी सर्व महिलांना गर्भधारणेदरम्यान पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे.

आहाराची घ्या विशेष काळजी

आपल्या आहारात जास्तीत जास्त निरोगी फळे आणि भाज्यांचा समावेश करा. फ्लेव्होनॉइड्स आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध फळे निवडा, हे तुमचे केसांचे कूप निरोगी ठेवतात आणि केस मुळांपासून मजबूत करतात. हे पोषक घटक शरीरातील हार्मोन्सचे संतुलन राखतात आणि फळांचे योग्य सेवन केल्याने शरीर डिटॉक्स होते, ज्यामुळे केसांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते.

या शॅम्पूचा करा वापर

बायोटिन आणि सिलिका असलेले शाम्पू बाजारात सहज उपलब्ध आहेत. जर तुम्ही आधीच सल्फेट युक्त शॅम्पू वापरत असाल तर आजच तुम



च्या केसांच्या निगामधून ते काढून टाका. बायोटिन आणि सिलिका हे केसांसाठी आवश्यक असलेले दोन घटक आहेत, जे टाळूमध्ये रक्त परिसंचरण वाढवतात आणि केसांच्या कूपांचे आरोग्य राखून मुळांपासून केस मजबूत करतात. अशा परिस्थितीत, गर्भधारणेदरम्यान तुम्हाला कमी किंवा कमी केस गळण्याचा सामना करावा लागतो.

ओले केस विंचरू नका

गर्भधारणेदरम्यान, स्त्रिया अतिशय संवेदनशील आणि मूडी राहतात आणि काहीवेळा जेव्हा त्यांचा मूड खराब होतो तेव्हा ते संयम गमावतात. अशा परिस्थितीत महिलांनी या काळात मन शांत ठेवण्यासाठी काही विशेष उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे आणि कोणतेही काम करताना घाई करू नये. उदाहरणार्थ, ओले केस ताबडतोब शॅम्पू करू नका, ओले केस सामान्य कोरड्या केसांपेक्षा अधिक संवेदनशील आणि कमकुवत असतात. या वेळी, विंचरु नका तेव्हा ते सहजपणे तुटतात. गरोदरपणात केस आधीच खराब झालेले असतात आणि मुळांपासून कम कुवत झालेले असतात, त्यामुळे ओल्या केसांना शॅम्पूने केस गळण्याची समस्या होऊ शकते. प्रथम केस नैसर्गिकरित्या कोरडे होऊ द्या आणि नंतर कंगवा करा.

गरम गोष्टी टाळा

जर तुम्ही तुमचे केस स्टाईल करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे हीटिंग टूल्स वापरत असाल तर आजपासून ते टाळा. गर्भधारणेदरम्यान, तुमचे केस आधीच संवेदनशील असतात, त्यामुळे गरम साधने त्यांना अधिक नुकसान करू शकतात. या परिस्थितीत सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे.

# 'ही' लक्षणे दिसत असतील तर समजा तुमचे पिरीयड अनहेल्दी आहेत!

मासिक पाळी ही प्रत्येक महिलेच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाची मानली जाते. अजूनही आपल्या समाजाच खुलेपणाने पिरीयडसंदर्भात बोलले जात नाही. इतकंच नाही तर मासिक पाळीसंदर्भात अनेक प्रकारच्या गैरसमजुती देखील आहेत. अशामध्ये अनेक मुलींना किंवा बायकांना माहिती असते का की, हेल्दी पिरीयड म्हणजे नेमके काय? याशिवाय पिरीयड सायकल, ब्लड कलर कसा असला पाहिजे?

अनेक तरूणींना याचं उत्तर देता येणार नाही. मात्र आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की, या लक्षणांद्वारे तुम्ही ओळखू शकता की, तुचमे पिरीयड हेल्दी आहेत.

किती दिवसांची असते पिरीयड सायकल?

मासिक पाळी ही २६-३५ दिवसांच्या कालावधीमध्ये आली पाहिजे. जर मासिक पाळी येण्यासाठी ४-५ दिवसांपेक्षा जास्त उशीर झाला असेल किंवा तुम्हाला २६ दिवस पूर्ण होण्यापूर्वी पुन्हा मासिक पाळी आली तर याचा अर्थ तुमच्या हार्मोन्समध्ये गडबड झाल्याची लक्षण आहे.

पिरीयड फ्लोमध्ये रक्ताच्या गुठळ्या दिसणं

पिरीयडच्या काळामध्ये जर तुम्हाला ब्लड क्लॉट म्हणजेच रक्ताच्या गुठळ्या दिसून येत असतील तर हे अनहेल्दी पिरीयडचं लक्षण आहे. इतकंच नव्हे तर तुमच्या रक्ताचा रंग गडद लाल असेल तरीही ते अनहेल्दी पिरीयड मानले जातात.

मासिक पाळीमध्ये वेदना होणं

अनेकदा मुलींना असं सांगितलं जातं की, मासिक पाळीमध्ये होणाऱ्या वेदना या सामान्य आहेत. मात्र हे चूक आहे. खरं म्हणजे मासिक पाळीपूर्वी किंवा मासिक पाळी सुरू असताना पाय, पाठ किंवा पोटात



दुखणं सामान्य नाही. या वेदनांकडे एकदा दुर्लक्ष करू नये. जर त्रास अधिकच होत असेल तर तज्ज्ञांचा अवश्य सल्ला घ्यावा.

इश्ए ची लक्षणं दिसणं

मासिक पाळीवेळी जर महिलांना पीएमएस म्हणजेच प्री मेन्स्ट्रुअल सिंड्रोमची लक्षणं जाणवत असतील तर हे देखील अनहेल्दी पिरीयडचं लक्षण आहे. काही महिलांना मासिक पाळीच्या १-२ आठवड्यांपूर्वी मूड स्विंग, चिडचिड, डोकेदुखी यांसारख्या समस्या दिसून येतात. या तक्रारी हार्मोन्समध्ये होणाऱ्या बदलांनी होतात.

# गणपतराव देशमुख यांच्या चित्रपटांमध्ये अहमद देशमुख साकारणार महत्त्वाची भूमिका २५ ऑक्टोबरला रिलीज होणार चित्रपट.

लातूर ( प्रतिनिधी) : -देशमुख या नावाला फार जुना,पारंपरिक, कर्तृत्ववान वारसा व वलय आहे.देश म्हणजे क्षेत्र-विभाग आणि मुख म्हणजे चेहरा-ओळख.

लातूरकडील देशमुख म्हणजे रुबाब, रुतबा आणि नावाला शोभेसे कर्तुक.राजकारण आणि कलाक्षेत्रात देशमुख हे नाव फार फार-आदराने घेतले जाते कारण विलासरावजी देशमुख असोत की रितेश देशमुख असो यांनी आपापल्या क्षेत्रात जपलेला सभ्यपणा लातूरला आणि महाराष्ट्राला देशविदेशात नावाजून गेला..रितेश देशमुख यांच्यामुळे लातूरमध्ये कला खूपच जोपासली व फोफावत चालली आहे.सगळ्या महाराष्ट्र लातूरकडे आशेने व आदराने बघत आहे. आणि लातूरकर या विश्र्वासावर खरे उतरतील कारण लातूरचाच आणखी एक देशमुख चित्रपट श्रुष्टीत हळूहळू आपली मुळे दमदारपणे पसरवत आहे.



अहमद देशमुख ... नाम तो सुना ही होगा.तोच अहमद देशमुख ज्याने ढिशक्याव सारख्या मराठी चित्रपटाची निर्मिती करत अभिनय क्षेत्रात भीमपाऊल टाकले आणि चित्रपट सृष्टी व महाराष्ट्राचे लक्ष कला क्षेत्रातील लातूरच्या खाणीकडे आकषत झाले.कौतुकाची व अभिमानाची ही गोष्ट होती की चित्रपट निर्माता असूनही अहमदने स्वतःला फालतू अहंकारात अडकू न देता तो अन्य प्रोडक्शनसाठी लिनतेने ऑडिशन देत होता.परिमाणतः त्याने अभिनय केलेला दुसरा चित्रपट आला. आल्याड पल्याड.आल्याड पल्याड ने कमाल केली. सलग महिनाभर रजत पडदा सोडला नाही.

अहमदचा अभिनय जाणकारांच्या नजरेत भरला आणि निर्माता-अभिनेता या ओळखीतून अभिनेता स्वावलंबी झाला.अहमद फार लवकरच पुढील टप्प्यात पोहचला. या पोहचण्यात घाई नव्हती तर गती होती. अहमदचा आणखी एक मराठी/ हिंदी चित्रपट आणि या चित्रपटाचे डारेक्टर अल्ताफ शेख हे आहेत.कर्मयोगी आबासाहेब २५ ऑक्टोबरला जगभर प्रदर्शित होतोय. स्वगय मा. आमदार गणपतराव देशमुख यांच्या विश्र्वासू साथीदाराच्या भूमिकेत तो आपल्या समोर येतोय. जी भूमिका करण्यासाठी कित्येक बड्या व नामांकित अभिनेत्यांनी लेखक/दिग्दर्शकाला सकाळी,दुपारी, संध्याकाळी, रात्री मेसेजचे रतीब मोबाईलवर घातले होते ती भूमिका अहमदला मिळावी ही लातूरच्या कष्टाळू मातीचा आणि देशमुख या आडनाव साधर्म्यचा अनोखा संयोग म्हणावा लागेल. अहमदचे आणखी काही चित्रपट कलाकार व निर्माता म्हणून लवकरच महाराष्ट्राच्या सजग व चोखंदळ प्रेक्षकांना बघायला मिळणार आहेत.रितेश देशमुख यांच्या नंतर अहमद देशमुख यांच्याकडे महाराष्ट्राच्या व देशाचे लक्ष असणार हे नक्की.अहमद देशमुख यांना त्यांच्या कष्टासाठी खूप खूप शुभेच्छा.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई उदय गवारे यांच्या निवासस्थानी दिली भेट विविध विषयावर केली चर्चा

लातूर (प्रतिनीधी) : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई एडवोकेट उदय गवारे यांच्या लातूर शहरातील गूळ मार्केट येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी लातूर शहर विधानसभा निवडणुकीतील विविध विषयावर चर्चा केली.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव,शेतकरी कामगार पक्षाचे भाई एकनाथराव कवठेकर नूतन जिल्हाचिटणीस ऍडव्होकेट सुशील सोमवंशी ट्वेंटीवन शुगरचे व्हा.चेअरमन विजय देशमुख डॉक्टर अनमोल गवारे भाई शिवाजी सुरवसे माधव बावगे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते संजय मुळे डॉक्टर अशोक पोद्दार दत्ता सोमवंशी एडवोकेट सुनील गायकवाड सिकंदर पटेल व्यंकटेश पुरी एडवोकेट सुमित खंडागळे रत्नदीप जाधव आदिसह काँग्रेस महाविकास आघाडीतील आजी,माजी नगरसेवक, पदाधिकारी कार्यकर्ते गवारे कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, शेतकरी कामगार पक्ष व इतर डावे पक्षांची आज भेट घेण्यासाठी मी इथे आलो आहे मित्र पक्षांचा सन्मान महाविकास आघाडीमध्ये कायम राहिल यासाठी मी सतत प्रयत्न करत राहीन शेतकरी कामगार पक्षाचे भाई जयंत पाटील यांच्याशी देशमुख कुटुंबांचे घनिष्ठ संबंध आहेत महाराष्ट्राच्या या लढाईत ते आमच्याबरोबर सक्रिय आहेत असे त्यांनी सांगितले. शेतकरी कामगार पक्षाचे नेते एडवोकेट भाई उदय गवारे म्हणाले की हरियाणा मध्ये काँग्रेसला दगा फटका झाला तसा महाराष्ट्रात होऊ नये सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील १६ अपात्र आमदारांचा निकाल द्यायला पाहिजे होता परंतु सध्या न्याय व्यवस्थेकडून निकाल देणे चालू आहे न्याय देणे चालू नाही. महायुती सरकारने महाराष्ट्रातील शेकडो एकर जमीन गौतम अदानीला दिली असे सांगून त्यांनी महाविकास आघाडीला साथ देण्याचे आवाहन केले.

## राशीभविष्य २४ ऑक्टोबर २०२४

मेष: शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
विचारपूर्वक केलेल्या कामात फायदा होईल. राजकीय क्षेत्रात किंवा व्यवसायातील निर्णय फायदेशीर राहतील. फुकटचा मोठेपणा दाखवू नका. स्तुतीपासून दूर रहा. मुलांचे जिवन आनंदी राहील.

वृषभ : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण
कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. बुद्धी चातुर्यामुळे आर्थिक स्थितीत वृद्धी होईल. यश, मान, प्रतिष्ठा मिळेल. घरगुती समस्यांकडे दुर्लक्ष करू नका.

मिथुन : शुभ रंग: लाल: शुभ दिशा: पूर्व
व्यवहारात स्पष्टपणा दाखवा. प्रवास शक्यतो आज टाळा. मानसिक त्रास राहणार आहे.कामकाजात मन लागणार नाही. कौटुंबिक समस्येमुळे चिंतेत रहाल.

कर्क :शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व
कामकाजात सावधानी बाळगा. वातावरण अनकूल जरी असले तरी आपले काम पूर्ण हेणार नाही. व्यापारात अडचणी येतील. स्थावर मालमत्ता खरेदी करण्याकरिता गडबड करू नका.

सिंह : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम
कामामध्ये कुटुंबातील सदस्याची मदत मिळाल्याने उत्साह वाढणार आहे. आरोग्य चांगले राहील. कायदेशीर प्रकरणात सावधानी बाळगा.

कन्या :शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. काही नवीन योजना आखताल. दुसऱ्याची निंदा करणे सोडून द्यावे.

तुळ: शुभ रंग :केसरी, शुभ दिशा: पश्चिम
अडकलेला पैसा मिळेल. सामाजिक कामात रस घ्याल. भावाच्या मदतीमुळे व्यवसायात फायदा होईल.दुसऱ्याच्या कामात निष्कारण हस्तक्षेप करू नका.

वृश्चिक: शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम
साहस व पराक्रमात वाढ होईल. एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीशी संबध येती. व्यावसायिक प्रकरणात घेतलेला निर्णय योग्य राहील आपल्या व्यसनांवर नियंत्रण असणे अवश्यक आहे.

धनु: शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
व्यापारात स्व:ताच्या मताने काम करा. स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा योग आहे. जीवनसाथीशी संबंध दृढ होतील. रागावर नियंत्रण राखा.

मकर :शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पूर्व
नौकरीत बढतीचे योग आहेत. कौटुंबिक जिवन आनंदी राहील. आर्थिक स्थिती चांगली असल्यामुळे आनंदी रहाल. बोलण्यावर नियंत्रण असू द्या. मनोरंजनाच्या संधी मिळतील.

कुंभ: शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पूर्व
अपूर्ण राहिलेले काम वेळेवर पूर्ण होतील. कौटुंबिक प्रगती होईल. थोडे प्रयत्न केल्याने फायद्याचे मार्ग मोकले होतील. वरिष्ट लोकामध्ये प्रतिष्ठा वाढेल. जोखमीचे कामात सावधानी बाळगा.

मीन :शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
श्रमाच्या कामात यश मिळेल. नवीन संबंध भविष्यात फायदेशीर असतील. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. मुलांच्या कामकाजावर लक्ष द्या.

## इतिहासात आजचा दिवस २४ ऑक्टोबर

अंतरराष्ट्रीय
१९२९ – न्यूयॉर्क शेअरबाजार कोसळला. जागतिक आर्थिक मंदीची सुरुवात.
१९४५ – नॉर्वेचा सूर्याजी पिसाळ व्हिडकुन क्विस्लिंग याला गोळ्या घालून मारण्यात आले.
१९६४ – संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना.
१९७६ – झांबिया हा आफ्रिकन देश स्वतंत्र झाला.
१९८४ – पूर्व तुर्कस्तानातील भूकंपात ३०० ठार.
२००४ – हमीद करजाईंनी अफगाणिस्तानच्या अध्यक्षपदी निवडणूक जिंकली.

राष्ट्रीय
१५७७ – शिखांचे चौथे गुरू रामदास यांनी अमृत सरोवर निर्माण केले. या सरोवराभोवती जी वस्ती झाली तिला 'अमृतसर' म्हणण्यात येऊ लागले.
१५७९ – फादर स्टीफन यांचे गोव्यात आगमन. त्यांनी मराठीत ख्रिस्तपुराण लिहिले.
१८४१ – गो.वि. ऊर्फ भाऊ महाजन यांच्या साप्ताहिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.
१९८४ – देशातील पहिली भुयारी रेल्वे कलकत्ता येथे सुरु झाली.
२००६ – प्रणव मुखर्जी यांना नवीन परराष्ट्र मंत्री बनविण्यात आले.
२००७ – मधुमिता शुक्ला हत्या प्रकरणात उत्तरप्रदेशचे माजी मंत्री अमरमणी त्रिपाठी, त्यांची पत्नी मधुमणी त्रिपाठी व इतर दोन्ही आरोपींना स्थानिक न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.
२००७ – नर्मदा बचाओ आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांना 'दांडेकर पुरस्कार' देण्याची घोषणा करण्यात आली.
२००७ – अयोध्यात ६ डिसेंबर १९९२ ला बाबरी मशीद विध्वंसानंतर कानपुरमध्ये उसळलेल्या दंगलीत ११ जणांच्या हत्यांमध्ये दोषी ठरवण्यात आलेल्या १५ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.
२००७ – कॅनॉट प्लेसमध्ये झालेल्या बनावट चकमकीत दोन निर्दोष व्यापाऱ्यांना ठार मारल्याप्रकरणी दोषी आढळलेले दिल्ली पोलिसांचे निलंबित सहायक आयुक्त एस.एस.राठी यांच्यासह दहा पोलिस कर्मचाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.
२००८ – मालेगाव बॉम्बस्फोटांप्रकरणी साध्वी प्रज्ञा सिंग ठाकूर, शामलाल साहू आणि शिवनारायण सिंग या संशयितांना अटक करण्यात आली. नाशिकच्या न्यायालयाने त्यांना ३ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या तिघांवरही सदोष मनुष्यवधाचा आणि हत्येचा कट रचल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

जन्म
१५३७ – लेडी जेन सीमूर, आठव्या हेन्रीची एकमेव पत्नी.
१६१८ – मुघल शहेनशहा औरंगजेब.
१६३२ – ऍंटन व्हान ल्युवेनहोएक, डच शास्त्रज्ञ.
१८६८ – भूतपूर्व औंध संस्थानाचे राजे भवानराव पंत प्रतिनिधी.
१९०८ – जॉन तुझो विल्सन, भूशास्त्रज्ञ.
१९२५ – केन 'स्लॅशर' मॅके, ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू.

निधन
१६०१ – टायको ब्राहे, डॅनिश खगोलशास्त्रज्ञ.
१९८९ – गोपाळ गुरुनाथ बेवूर, भारताचे माजी लष्करप्रमुख.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894